नि.दि.दा.क्र.१६९/२०२४
किशन वि. पांडूरंग व इतर ०४

| | |
|---|---|
| MHLA120008042024 | **निशाणी क्र. ५ ेवरील आदेश** |

सदरचा अर्ज वादी यांनी तुर्तातूर्त मनाई हुकुमाकरीता दिवाणी प्रकिया संहिता कलम ३९ रुल १ व २ प्रमाणे दाखल केलेला आहे.

०२. वादीने प्रस्तुतचा दावा कायमस्वरुपी मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. वादी व प्रतिवादी हे एकमेकांचे घराचे शेजारी आहेत. सदर विवाद मिळकत ही वादीची वडीलोपार्जित मिळकत असुन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

| | |
|---|---|
| मौजे अंबुलगा (बु), ता.निलंगा, जि.लातूर | ग्रामपंचायत मिळकत क्र.८५२ याचे दक्षिण-उत्तर क्षेत्र ४३ फुट आणि पुर्व-पश्चिम क्षेत्र २८ फुट याचे एकुण क्षेत्र १२०४ चौरस फुट. |

(यापुढे सोयीकरीता वरील मिळकतीस दावा मिळकत असे संबोधन्यात येईल.)

विवाद मिळकतीच्या चतुःसीमा खालीलप्रमाणेः-

पुर्वेस - दगडु बालाजी सोनकांबळे यांचे घर.

पश्चिमेस - भावकी रस्ता.

दक्षिणेस - वादीचा स्वतःची जागा ग्रामपंचायत मिळकत क्र.८५४

उत्तेस - बोळ

०३. वादी असे कथन करतात की, सदरील विवाद मिळकत ही वादीची वडिलोपार्जित मिळकत असुन वादीचे चुलते बंडू अवजीबा सोनकांबळे यांच्यामध्ये व वादीमध्ये

झालेल्या दि.२३/१०/२०२३ रोजीच्या नोटराईज्ड वाटणीपत्राआधारे वादीचे हिश्यास आलेली आहे. सदरचे वाटणीपत्रापासून वादीचे वडील व त्यानंतर वादी वाद मिळकत उपभोगत आहे. केवळ मिळकत ही प्रतिवादीचे नावे असल्याने वादीचे सन २०२३ मध्ये चुलते बंडू यांच्याकडून सदरची मिळकत वाटणीपत्राआधारे स्वतःचे नावे करुन घेतली आहे.

०४. वादी पुढे असे कथन करतात की, प्रतिवादी हे वादीचे वाद मिळकतीचे पुर्वे कडील बाजुचे शेजारी आहेत. प्रतिवादी हे विनाकारण विवाद मिळकतीवरील शांततामय ताब्यामध्ये अडथळा व हस्तक्षेप करत आहेत. वाद मिळकत ही प्रतिवादीची आहे असे भासवून वाद मिळकत ही खुली असल्याने सदर जागेचा उपभोग घेण्याच्या हेतूने प्रतिवादी विवाद मिळकतीवर अतिक्रमण करुन वादी यांच्या मिळकतीवरील शांततामय ताब्यामध्ये अडथळा व हस्तक्षेप करीत आहे. विवाद मिळकतीमध्ये प्रतिवादी हे त्यांचा जळणफाटा टाकणे, गाडी लावणे तसेच इतर टाकाऊ वस्तु तेथे टाकणे असे प्रकार करीत आहेत. सदरची मिळकत वादीच्या मालकीची असल्यामुळे प्रतिवादी यांनी कसल्याही प्रकारचा अडथळा करु नये अशी विनंती वादीने केली. परंतु प्रतिवादींनी ती विनंती साफ धुडकावून लावली व विवाद मिळकतीमध्ये हस्तक्षेप करणे चालूच ठेवले. वादी हा अपंग असुन तो काठीच्या आधारावर चालतो या गोष्टीचा गैरफायदा घेऊन प्रतिवादी यांच्याकडे असलेल्या मनुष्यबळाचा गैरवापर करुन विवाद मिळकतीमधून वादीस बेदखल करण्याचा प्रयत्न प्रतिवादी करीत आहेत. तसेच एक ना एक दिवस तुझी जागा ग्रामपंचायतीला आमच्या नावे करुन घेणार अशी धमकी प्रतिवादीने वादीला दिली. त्यामुळे वादीने प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. त्यामुळे विवाद मिळकतीमध्ये वादीच्या शांततामय मालकी व ताब्यामध्ये प्रतिवादी, त्यांचे नोकर, चाकर, नातेवाईक, मित्र व एजंटने कसल्याही प्रकारचा हस्तक्षेप व अडथळा करु नये अशा प्रकारचा तात्पुरता मनाई हुकूम वादीच्या हक्कात देण्यात यावा अशी ते विनंती करतात.

०५. प्रतिवादी क्र.२ ते ४ यांनी त्यांचे म्हणणे नि.क्र.१५ कडे दाखल करुन अर्जास सक्त हरकत नोंदवली आहे. वादी व प्रतिवादी यांचे घर शेजारी असल्याची बाब त्यांनी मान्य

केलेली आहे. परंतु दाव्याच्या परिच्छेद क्र.२ मध्ये नमुद केलेली मिळकत ही विवाद मिळकत होऊ शकत नाही. कारण वादी हा वाद मिळकतीचा मालक व कब्जेदार नाही किंवा त्याच्या नावे सदर मिळकतीचा मालकी दाखवणारा कोणताही दस्तऐवज उपलब्ध नाही. दावा मिळकत ही वादीची वडिलोपार्जित मिळकत नाही. वादी हा बंडू अवजीबा सोनकांबळे यांचा मुलगा नसल्यामुळे बंडू अवजीबा सोनकांबळे यांनी दि.११/०८/१९९६ रोजी इराप्पा लक्ष्मण सोनकांबळे, पांडूरंग लक्ष्मण सोनकांबळे, अंबादास कोंडीबा सोनकांबळे, माधव कोंडीबा सोनकांबळे यांना संयुक्तीकरीत्या दिलेली आहे व त्या मोबदल्यामध्ये आनंदवाडी या जागेबरोबर बदल केला आहे. त्यामुळे प्रतिवादींचा विवाद मिळकतीमध्ये हिस्सा आहे. आज स्थितीत मुळ ग्रामपंचायत रोकॉर्डला मिळकत क्र.८५२ चा मालक हा बंडू अवजीबा सोनकांबळे हाच आहे. प्रतिवादींनी वादीच्या मिळकतीवर कधीही अडथळा व हस्तक्षेप केलेला नाही. दाव्यात नमुद मिळकत ही सामाईक मिळकत असुन सर्व प्रतिवादींचा त्यामध्ये हिस्सा आहे. केवळ विवाद मिळकत ही बळकवावी या उद्देशाने वादीने खोटा दावा दाखल केलेला आहे. त्यामुळे वादीचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा अशी विंनती करतात.

०६. वादीतर्फे विधीज्ञ श्री.एच.व्ही.आलमले आणि प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. जी.आर.साळुंखे यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता खालील मुद्दे दिसून येतात– त्यावरील निष्कर्ष व कारणमिमांसा खालील प्रमाणे .

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१. | वादीस प्रथमदर्शनी केस आहे काय ? | नाही |
| ०२. | न्यायीक हक्काचा समतोल वादीच्या बाजूने आहे काय ? | नाही |
| ०३. | तूर्तातूर्त ताकीद दिल्यास कोणाचे अपरिमित असे नुकसान होणार आहे ? | प्रतिवादीचे |

| | | |
|---|---|---|
| ०४. | काय आदेश ? | अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ ते ३ करिता :**

०७. मुद्दा क्र.१ ते ३ हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे कथनांची पुनरावृत्ती टाळण्याकरीता यापुढे ते एकत्र विचारात घेण्यात येतील.

०८. वादीने सदरचा अर्ज तुर्तातुर्त ताकीदीकरीता दाखल केलेला असल्यामुळे या पायरीवर वादीचा दावा प्रथमदर्शनी चालू शकण्यासारखा आहे का, न्यायाचा समतोल कोणाच्या बाजुने आहे व कधीही न भरुन येणारे नुकसान कोणाचे होणार आहे हे पहाणे जरुरीचे ठरते.

०९. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी व प्रतिवादी हे एकमेकांचे शेजारी आहेत. प्रतिवादी हे वादीच्या ताबे कब्जास हरकत व अडथळा करीत आहेत. त्यामुळे वादीने प्रस्तुतचा दावा कायमस्वरुपी मनाई हुकूमाकरीता दाखल केलेला आहे. वादी घर नंबर ८५२ चा मालक व कब्जेदार आहे असे कथन घेऊन आलेला आहे. याउलट, प्रतिवादी हे दावा मिळकत ही वादीच्या मालकीची नाही असे मत घेऊन आलेले आहेत. वादीने त्यांच्या कथनाच्या पृष्ठयर्थ यादी नि.क्र.०४ कडे मिळकत नंबर ८५२ चा सन २०१५-२०१६ चा नमुना ८-अ चा मुळ उतारा दाखल केलेला आहे. त्यावर मालकाचे नाव म्हणून वादी यांच्या नावाची नोंद दिसून येते. तसेच वादी अपंग असल्याबाबतचे प्रमाणपत्र दाखल आहे. परंतु महाराष्ट्र जमीन महसुल संहिता, १९६६ कलम १५६ नुसार कोणताही महसुली उतारा कोणत्या व्यक्तीची मालकी ठरवित नाही. त्यामुळे नमुना ८-अ चा उतारा किंवा ७/१२ उताऱ्यावरुन कोणत्याही व्यक्तीची मालकी किंवा त्याचा ताबा ठरवला जाऊ शकत नाही. प्रस्तुतच्या प्रकरणात दाखल असलेल्या नमुना ८-अ च्या उताऱ्यावरुन केवळ वादी दावा

मिळकतीच्या ताब्यात आहे असे म्हणता येणार नाही. वादी दावा मिळकत वडिलोपर्जित मिळकत आहे असे कथन घेऊन आलेला आहे. परंतु त्याने त्या संदर्भात कोणतेही कागदपत्र दाखल केलेले नाही.

१०. तसेच वादीच्या वकीलांनी युक्तीवादाच्या वेळेस प्रतिवादी हे वादीच्या कब्जास अडथळा करीत असल्यामुळे त्या संदर्भातील पोलीस तक्रारी व फौजदारी प्रकरणे दाखल झाल्याबाबत नमुद केले आहे. परंतु अभिलेखावर प्रतिवादी हे वादीच्या ताबे कब्जास हरकत व अडथळा निर्माण करीत आहेत असा कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल नाही. दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ३९ रूल १ व २ नुसार तुर्तातुर्त अर्जाच्या कामी मिळकतीवरील ताबा संरक्षित करावयाचा असतो. वादी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरुन दावा मिळकत ही वादींच्या ताबेकब्जात आहे ही बाब स्पष्ट होत नाही. त्यामुळे दावा मिळकत ही वादीच्या ताब्यात आहे असे म्हणणे उचित होणार नाही. तसेच दाव्याचे स्वरुप पाहता या पायरीवर प्रतिवादींविरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकूम देणे योग्य वाटत नाही. वरील सर्व चर्चेवरुन असे दिसुन येते की, दावा मिळकत ही वादीच्या ताबे कब्जात आहे ही बाब सिध्द करण्यात वादी अपयशी ठरलेले आहेत. त्यामुळे प्रथमदर्शनी केस वादीच्या बाजूने नाही, असा निष्कर्ष मी नोंदवित आहे.

११. एकूणच अर्जातील कथने व मागण्यांचा विचार केला असता असे दिसून येते की, प्रथमदर्शनी दावा वादीच्या बाजूने आहे, हे सिध्द करण्यात वादी अयशस्वी ठरले असल्यामुळे जर का तुर्तातुर्त ताकीद प्रतिवादींच्या विरुध्द देण्यात आली तर प्रतिवादीचे अपरिमित असे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे न्यायाचा तराजू प्रतिवादींच्या बाजूने झूकता आहे. सबब वरील चर्चेवरुन असे दिसून येते की, वादीच्या बाजूने प्रथम दर्शनी केस नाही व न्यायाचा तराजू प्रतिवादीच्या बाजूने आहे व वादीची मागणी मान्य केल्यास प्रतिवादीचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ करीता</u>**

१२. मुद्दा क्र. १ ते ३ चे निष्कर्षास अनुसरुन मी मुद्दा क्र. ४ करीता खालील आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

| अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात येतो. |
|---|

Digitally signed by KOMAL PRAMOD GADE
Date: 2025.08.05 17:38:06 +0530

निलंगा (श्रीमती. के. पी. गाडे )

दि – ०५/०८/२०२५ २रे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर

निलंगा, लातूर